# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

C/O महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ कार्यालय इमारत
(दुसरा व चौथा मजला) सर्व्हे नं. ८३२ ए, शिवाजीनगर पुणे ४११००४
दूरध्वनी क्र.:-०२०- २६१२३०६६/६७ वेबसाइड:-mscepune.in ई-मेल :-mscepune@gmail.com


**दरपत्रक सूचना**

जा.क्र. मरापप/भांडार/2022/ 8200
दिनांक : 19/12/2023

प्रति,

-------------------------

-------------------------

-------------------------

**विषय** :- परिषदेतील प्रिंटर्सचे टोनर रिफिलिंग करणेसाठी (साहित्यासह) पुरवठादार संस्था नियुक्तीकरिता दरपत्रक मागविणेबाबत.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतील संगणकाच्या प्रिंटर्सचे टोनर रिफिलिंग व आवश्यकतेनुसार साहित्यासह पुरवठा करणेकामी दिनांक 01/01/2024 ते दि.31/12/2024 पर्यंत एक वर्ष कालावधीसाठी पुरवठादार संस्था निश्चित करावयाची आहे. त्याकरिता खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून बंद लिफाफ्यामध्ये दरपत्रक खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून दरपत्रके मागविण्यात येत आहे.

**परीक्षा परिषदेचा स्थलांतरित पत्ता-** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे व्दारा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, (दुसरा व चौथा मजला) भांबुर्डा, शिवाजीनगर, (राज्यमंडळ), पुणे - 04 यांच्या इमारतीमध्ये.

**अटी व शर्ती-**

1. दरपत्रक बंद पाकिटात असावेत.
2. **लखोटा क्र.1** मध्ये सर्व तांत्रिक कागदपत्रे **(लखोटा क्र.1 तांत्रिक कागदपत्रे)** जोडून सिलबंद करण्यात यावा व त्यावर तांत्रिक कागदपत्रे बाबतचा लखोटा असा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा.
3. **लखोटा क्र.2** मध्ये वित्तीय दर सर्व करासहित नमूद करुन **(लखोटा क्र.2 वित्तीय दर)** लखोटा सिलबंद करण्यात यावा व त्यावर दराचा लखोटा असे स्पष्ट उल्लेख करण्यात यावा.
4. दरपत्रकात सेवेसाठीचा दर वस्तू व सेवा करासहित (GST) समाविष्ट करण्यात यावा.
5. दरपत्रकामधील सेवा सर्व साधारणपणे ज्यांना सेवा देण्याबाबत कार्यादेश देण्यात आले आहेत. त्यांनी वस्तू व सेवा कर (GST) क्रमांक व इन्कम टॅक्स क्लियरन्स सादर करणे अपेक्षित आहे.
6. कोणतीही गोंधळात राहणारी किंवा वेगवेगळे अर्थ न निघणारी बाब दरपत्रकात राहणार नाही. याची काळजी घ्यावी.
7. कोणतेही कारण न दर्शविता दरपत्रक रद्द करण्याचा किंवा न स्विकारण्याचा अधिकार मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांनी राखून ठेवलेला आहे.
8. **लखोटा क्र.1** (तांत्रिक कागदपत्रे) मधील दर्शविलेली प्रमाणपत्रे अपूर्ण असल्यास **लखोटा क्र.2** (वित्तीय दर) उघडण्यात येणार नाहीत.
9. मंजूर होणाऱ्या संस्थेसोबत रुपये 500/- रकमेच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करण्यात येईल.
10. संस्थेकडून अटी नमूद करण्यात आलेल्या दरपत्रकांचा विचार करण्यात येणार नाही. परिषदेकडून याबाबत सबबी ऐकून घेतल्या जाणार नाहीत वा त्याकडून पत्रव्यवहार करण्यास परिषद बांधील राहणार नाही.

11. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतील **प्रिंटर्सचे तपशील (रिफिलिंग)** करणेसाठीचे विवरण **लखोटा क्र.2** मध्ये नमूद केले नुसार वित्तीय दराचे दरपत्रक सादर करण्यात यावे.
12. टोनर रिफिलिंग करतेसमयी भरण्यात येणारी पॉवडर उत्तम दर्जाची (ब्रँडेड कंपनीची) असावी तसेच रिफिलिंग टोनरचे ब्रँडेड पॉवडर मशिनव्दारे भरण्यात यावे.
13. कार्यालयात उपरोक्त नमूद केलेल्या टोनरची प्रथमत: तपासणी करून प्रत्येक टोनर रिफिलिंग आणि तो प्रिंटरला जोडावी लागेल. आवश्यकतेनुसार आवश्यक स्पेअर पार्टसची माहिती घेऊन त्याप्रमाणे सर्व साहित्याची पूर्तता करून द्यावी लागेल.
14. रिफिलिंग करण्यात येणाऱ्या टोनरच्या आतील सुट्टे भाग आवश्यकतेनुसार बदलण्यात येवून तात्काळ पुरवठा करावा लागेल.
15. सदर कामकाजासाठी वाहनखर्च, इंधन खर्च इत्यादींचा विचार करुन दर भरावेत, तसेच याकामी अग्रिम रक्कम देण्यात येणार नाही.
16. रिफिलिंग केलेल्या टोनरमध्ये काही दोष आढळून आल्यास, प्रती सुस्पष्ट येत नसल्यास, सदर टोनर नि:शुल्क व तात्काळ बदलून देणे आवश्यक आहे.
17. रिफिलिंग करण्यात येणारा टोनर हा विभाग/शाखेनी दिलेल्या मान्य टिपणीनुसार रिफिलिंग करुन त्याच शाखेत / विभागात देण्यात यावा. सदर टोनर इतरत्र शाखेत / विभागात बदल करण्यात येवू नये.
18. सार्वजनिक / शासकीय सुट्टी असली तरी परिषदेत टोनर रिफिलींग करणेसाठी मागणी केल्यास निविदाकारांनी तात्काळ टोनर रिफिलींग करुन देण्यात यावे.
19. सदर कामकाजाची देण्यात येणारी सेवा समाधानकारक नसल्यास संस्थेची सेवा नाकारण्यात येईल, याची संपूर्ण जबाबदारी निविदाकाराची राहील.
20. सदर पुरवठ्याबाबत कोणताही वाद उद्‌भवल्यास अथवा न्यायालयीन प्रकरण (कोर्ट मॅटर) झाल्यास त्याचे कार्यक्षेत्र पुणे येथील न्यायालयातच अपील करणे बंधनकारक राहील.
21. निश्चित करण्यात आलेल्या प्रिंटर्सचे टोनर रिफिलिंग करणेसाठी (साहित्यासह) पुरवठा करणाऱ्या संस्थेने मान्य दराने पुरवठा केलेला नसल्यास सदर कामाबाबतची तीव्रता लक्षात घेवून रकमेच्या दंडाची आकारणी करण्याचे अधिकार परिषदेस राहतील.
22. सदर दरपत्रक परिषदेच्या संकेतस्थळांवर **www.mscepune.in** उपलब्ध आहे.
23. सिलबंद लखोट्यावर लखोटा क्र.1 तांत्रिक कागदपत्रे - व लखोटा क्र.2 वित्तीय दर, **परिषदेतील प्रिंटर्सचे टोनर रिफिलिंग करणेसाठी** दरपत्रक असे स्पष्ट नमूद करुन दि.26 / 12/2023 रोजी दुपारी 03.00 वाजेपर्यंत महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, व्दारा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, (राज्यमंडळ) भांबुर्डा, शिवाजीनगर, आघारकर इन्स्टिटयुट मागे, आगरकर रोड, पुणे-04 येथे (दुसरा मजला, आवक-जावक शाखेत) कार्यालयात हस्तपोच / सादर करण्यात यावी / देण्यात यावी.
24. दरपत्रक **परीक्षा परिषदेच्या स्थलांतरित (राज्य मंडळ) पुणे** येथील चौथ्या मजल्यावरील आयुक्त दालनात दि.27/12/2023 रोजी उघडण्यात येईल. त्यावेळेस आपण अथवा आपला प्रतिनिधी योग्य त्या ओळखपत्रासह हजर राहू शकतो. काही प्रशासकीय वा कार्यालयीन अडचणीमुळे दरपत्रक उघडणे शक्य झाले नाही तर लगतच्या नंतरच्या दिनांकास वा परिषदेच्या सोयीनुसार ठरवून दिलेल्या दिवशी उघडण्यात येतील.
25. टपालाव्दारे/मेलव्दारे/कुरीअर व्दारे प्राप्त दरपत्रके स्विकारली जाणार नाहीत.

(अनुराधा ओक)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे.

**लखोटा क्र.1 - तांत्रिक कागदपत्रे -**

1. संस्था नोंदणीकृत सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र.
2. संस्थेचे/प्रोप्रायटर यांचे पॅन कार्ड.
3. जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र. (जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र नसल्याबाबतचे संस्थेच्या लेटर हेडवर स्वयंघोषित प्रमाणपत्र).
4. ITR, Assessment Year 2022-23.
5. केंद्र शासन, राज्य शासन, सार्वजनिक, किंवा Technoligies क्षेत्रातील संस्थांमध्ये काम केल्याचे छायांकित प्रती.
6. शासन अंगीकृत संस्थामध्ये काळ्या यादीमध्ये नाव नसल्याबाबतचे स्वयंघोषित प्रमाणपत्र.

**लखोटा क्र.2 वित्तीय दर -**

| अ.क्र. | प्रिंटर्स तपशील | दर प्रति नग रक्कम रूपये (जीएसटी व सर्व करासहित) |
|---|---|---|
| 1. | HP LASER JET M1005, SAMSUNG 1020, HP Q 2612, CANON MF 3010 - **Toner Refilling** | |
| 2. | HP LASER JET M1005, SAMSUNG 1020, HP Q 2612 CANON MF 3010 - **New Toner Cartridge** | |
| 3. | Xerox (work centre 3025) - **Toner Refilling** | |
| 4. | Xerox (work centre 3025) - **New Toner Cartridge** (compatible) | |
| 5. | Xerox (work centre 3025) - **New Original Toner Cartridge** | |
| 6. | Xerox B 235 - **Toner Refilling** | |
| 7. | Xerox B 235 - **New Toner Cartridge** (compatible) | |
| 8. | Xerox B 235 - **New Original Toner Cartridge** | |
| 9. | HP Colour Printer Ink Bottle Refilling Black 170 ml. (Brand hp GT 51) चे दर नमूद करण्यात यावे | |
| 10. | HP Colour Printer Ink Bottle Refilling Cyan 70 ml. (Brand hp GT 52) चे दर नमूद करण्यात यावे | |
| 11. | HP Colour Printer Ink Bottle Refilling Yellow 70 ml. (Brand hp GT 52) चे दर नमूद करण्यात यावे | |
| 12. | HP Colour Printer Ink Bottle Refilling Magenta 70 ml. (Brand hp GT 52) चे दर नमूद करण्यात यावे | |
| 13. | Supporting Parts (आवश्यकतेनुसार) | |

(अनुराधा ओक)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे.